# आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ

मुख्य कार्यालय गट नं. १६५१, हिंदू चौक, श्रीरामनगर, मेन रोड, रेंदाळ. ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

## ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

**(फक्त भागधारक सभासदांचेकरिता)**

बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना कळविणेत येते की, बँकेची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत रविवार, दि. ०६/०९/२०२६ इ. रोजी दुपारी ठिक २.०० वाजता हिंदू चौक, श्रीरामनगर, मेन रोड, रेंदाळ येथील बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या इमारतीमध्ये खालील विषयांवर विचारविनिमय करणेकरिता बोलविणेत आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१. मागील सभा दि. १७/०८/२०२५ रोजी झालेल्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.

२. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक स्वीकृत करणे.

३. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार ३१ मार्च २०२६ अखेरील नफा विभागणीस मंजुरी देणे.

४. मा.संचालक मंडळाने सन २०२६-२७ सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास व सन २०२५-२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५. सन २०२५-२६ च्या लेखापरीक्षणाबाबत मा. वैधानिक लेखापरीक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद घेणे.

६. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

७. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी डी. डी. पोमाजे & कंपनी, चार्टर्ड अकौंटंट्स, सांगली यांची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मा.संचालक मंडळाने केलेल्या नियुक्तीस रिझर्व्ह बँकेची मंजुरी मिळालेली असलेने त्याची नोंद घेऊन केले कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देणे.

८. मा. संचालक मंडळाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत तपासणीसाठी प्राप्त अर्जामधून सच्चिदानंद & कंपनी, चार्टर्ड अकौंटंट्स, कोल्हापूर यांची अतर्गत लेखापरीक्षक (इंटर्नल ऑडिटर) म्हणून केलेली नियुक्ती व ठरविलेला मेहनताना यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

९. मा. संचालक मंडळाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता इन्कम टॅक्स ऑडिट व तत्सम कामासाठी प्राप्त अर्जामधून पोवार सामंत & जाधव, चार्टर्ड अकौंटंट्स, कोल्हापूर यांची टॅक्स ऑडिटर म्हणून केलेली नियुक्ती व ठरविलेला मेहनताना यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

१०. मा. वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेनुसार सहकार खाते महाराष्ट्र शासन, यांचे नागरी सहकारी बँकांना लागू केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सहभाग घेतलेल्या व त्यानुसार कर्ज परतफेड केलेल्या कर्जदारांची नोंद घेऊन त्यास मंजुरी देणे.

११. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये कर्ज हप्त्याची नियमितपणे परतफेड करणाऱ्या सभासदांना मा. संचालक मंडळ सभेने मंजूर केलेल्या कर्जावरील व्याजातील रिबेटला कार्योत्तर मंजुरी देणे.

१२. या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

१३. मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**दिनांक - १७/०८/२०२६**
**स्थळ - रेंदाळ**

संचालक मंडळाचे आदेशानुसार
श्री.सूर्यकांत शंकरराव जाधव
सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सूचना-** १) गणसंख्येअभावी (कोरम) सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी ठिक ०२.३० वाजता घेतली जाईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता असणार नाही. २) सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी गुरुवार, दि. ०३/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवाव्यात. पाठविलेल्या प्रश्नाचे उत्तर संबंधित सभासदास सभेच्या दिवशी देणेत येईल. ३) पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रु. १०००/- असून ज्या सभासदांची भागधारणा त्यापेक्षा कमी आहे किंवा रु.१०००/- च्या पटीत भागधारणा केलेली नाही त्यांनी अपूर्ण भागभांडवलाची रक्कम लवकरात लवकर भरून सहकार्य करावे. ४) ज्या नियमित सभासद खातेदारांनी सी-केवायसी (C-KYC) बाबतचे कागदपत्रांची अद्याप पूर्तता केलेली नाही त्यांनी आपला ग्राहक ओळखा निकष (KYC Norms) नुसारची कागदपत्रे (उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड व अद्यावत फोटो) व अद्यावत मोबाईल नंबर बँकेच्या संबंधित शाखेकडे सादर करावीत. तसेच ज्या सभासदांचे पत्त्यामध्ये बदल झालेला आहे त्यांनी बदल झालेल्या पत्त्याचा तपशील लेखी स्वरूपात नजीकच्या शाखेत किंवा मुख्य कार्यालय, बोर्ड विभाग यांचेकडे सादर करणेचा आहे.

**टीप -** ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल सभासदांना पोस्टाने / घरपोच पाठविलेला आहे. तथापि, ज्या सभासदांना सदरचा अहवाल मिळाला नसलेस, त्यांनी बँकेचे मुख्य कार्यालय किंवा नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.